# सोलापूर विद्यापीठ

**परीक्षा विभाग**
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव,
सोलापूर - ४१३ २५५
ईपीएबीक्स - ०२१७ -२७४४७६०/६१/६३/६६/७१/७२/७३ /७४/७८/७९
फॅक्स नं. - ०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई-मेल: coe@sus.ac.in

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# Solapur University

**Examination Section**
Solapur-Pune National Highway, Kegaon,
Solapur-413 255
EPABX No.0217- 2744760/61/63/66/71/72/73/74/74/79
Fax No.0217-2744770
Web Site http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
email id: coe@sus.ac.in


Ref No.SUS/EXAM/2016-17/ 1324 Date 14/07/2016. 14 JUL 2016

प्रति,
**मा.प्राचार्य,**
सर्व संलग्नीत कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये,
**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.**

**विषय :** B.A.,B.Com.,B.Sc.,M.A.,M.Com.,M.Sc. या अभ्यासक्रमाच्या Pattern २००४,२००७,२००८ व Core Pattern या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संधीबाबत.

**संदर्भ :** १.दि.४.३.२०१५ रोजी झालेल्या परीक्षा मंडळ सभेतील ठराव क्र.७.
२.विद्यापीठाचे पत्र क्र.सोविसो/प.वि./२०१४-१५/२६९५ दि.२६ मार्च २०१५.
३.दि.१८.०८.२०१५ च्या मान्यतेच्या टिपणीअन्वये विद्यार्थ्यांकडून घेण्यात आले स्वयंघोषणापत्र.
४.विद्यापीठ अनुदान आयोगाचे गाईडलाईन्स संदर्भातील विद्यापीठाचे पत्र क्र.९९१ दि.२६.५.२०१६

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आलेल्या जून्या अभ्यासक्रमाच्या (Pattern २००४,२००७,२००८ व Core Pattern) विद्यार्थ्यांना संबधीत अभ्यासक्रमासाठी प्रवेशीत होवून ८ ते १० वर्षाचा कालावधी झालेला आहे. सर्वसाधारणपणे कोणतीही पदवी ६ वर्षात पूर्ण केली पाहीजे असा नियम असून दि.४.३.२०१५ रोजी झालेल्या परीक्षा मंडळाचे बैठकीत तीन वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना तीन वर्षानंतर तीन वर्षापर्यंत परीक्षेच्या संधी (सहा संधी) व दोन वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना दोन वर्ष (चार संधी) संधी देण्यात यावी असा ठराव करण्यात आलेला असून ही बाब दि.२६ मार्च २०१५ रोजी पत्रान्वये सर्व महाविद्यालयांना कळविण्यात आली असून त्यात मार्च २०१५ ही अंतीम संधी देण्यात आलेली आहे असे नमूद करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थी हित लक्षात घेऊन ही संधी मार्च २०१६ च्या परीक्षेपर्यंत वाढवून देण्यात आली होती तसेच संबधीत विद्यार्थ्यांकडून, संबधीत पदवी मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करेन अन्यथा ऑक्टोबर २०१६ ला प्रथम वर्षापासून प्रवेशी त होवून पदवी पूर्ण करेन, असे स्वयंघोषणा पत्र लिहून घेण्यात आले होते.

त्याचप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वरील संदर्भ क्र.४ च्या पत्रानुसार कोणतीही पदवी/पदव्यूत्तर पदवी ही विहीत कालावधीत (अभ्यासक्रम पूर्ण करणेसाठी लागणारा कालावधी) +२ वर्ष या कालावधीमध्येच पूर्ण करावी लागेल असे विद्यापीठाकडून सर्व महाविद्यालयांना दि.२६.५.२०१६ चे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता, वर उल्लेख केलेल्या जून्या अभ्यासक्रमाच्या (Pattern २००४,२००७,२००८ व Core Pattern) विद्यार्थ्यांचा पदवी पूर्ण करण्याचा विहीत कालावधी पूर्ण झाला असून या विद्यार्थ्यांच्या संधी संपलेल्या असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांनी त्यांची इच्छा असेल तर नवीन अभ्यासक्रमानुसार प्रथम वर्षात प्रवेश घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरील विद्यार्थ्यांचे वर दर्शविलेल्या जून्या अभ्यासक्रमाचे (Pattern २००४,२००७,२००८ व Core Pattern) परीक्षा आवेदनपत्र स्वीकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी. सदरील बाब सर्व विद्यार्थी व संबधीतांच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक